**मानीव अभिहस्तांतरणातील अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने कागदपत्रे निश्चित करणे.**

# महाराष्ट्र शासन
## गृहनिर्माण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१/दुवपु-२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १८ सप्टेंबर, २०१७

**वाचा -**

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१/दुवपु-२, दि. १४ जून, २०१६.

**प्रस्तावना -**

संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१/दुवपु-२, दि. १४ जून, २०१६ अन्वये अर्जदार संस्थेने मानीव अभिहस्तांतरणाच्या अर्जासोबत एकूण ८ (आठ) कागदपत्रे आवश्यक राहतील असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील मानीव अभिहस्तांतरणाच्या अर्जासोबत अर्जदार संस्थेने सादर करावयाच्या कागदपत्रातील अनुक्रमांक ७ नुसार नियोजन प्राधिकरणाने प्रमाणित केलेले बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. आता महाराष्ट्र राज्यात दि. ०१ मे, २०१७ पासून महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) कायदा अंमलात आला असून सदर अधिनियम व त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार ज्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही अश्या इमारतींची नोंदणी गृहनिर्माण प्राधिकरणाकडे करणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे मानीव अभिहस्तांतरणासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होण्याची शक्यता विचारात घेऊन संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-**

संदर्भीय शासन निर्णयातील मानीव अभिहस्तांतरणच्या अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रातील अनुक्रमांक ७ येथील प्रमाणपत्राऐवजी खालील मजकुराचा समावेश करण्यात येत आहे.

"मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्थेकडून भोगवटा प्रमाणपत्राऐवजी इमारतीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आल्याचे तसेच सदर इमारतीच्या संदर्भात असलेल्या सर्व जबाबदाऱ्या/दायित्व स्विकारण्यास तयार असल्याचे स्व-प्रमाणपत्र घेण्यात यावे. मानीव अभिहस्तांतरण प्राप्त झाल्यानंतर संस्थेने मुंबई महानगरपालिका किंवा संबंधित नागरी स्थानिक संस्थेकडे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा."

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१८१५५१५८२७०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Suhas Madhav Mamdapurkar
Date: 2017.09.18 15:42:26 +05'30'

**( सुहास ममदापूरकर )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई.(पत्राने)
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
३. मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व महापालिका आयुक्त/प्रशासन.
९. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद
१०. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. निबंधक तथा सहकार आयुक्त, पुणे.
१२. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१३. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१५. सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई.
१६. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
१७. सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. निवड नस्ती (दुवपू-२). गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.